RN OFFICIAL WORK

अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कार्यालय-कुलसचिव, मफुकृवि, राहुरी

ई-मेल व्दारे

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१६
फॅक्सक्र. ०२४२६-२४३८१६
ई-मेल registrar.mpkv@nic.in

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन- ४१३७२२.

जा.क्र./प्रशासन-ड/मत्ता व दायित्व/ १३२५ /२०२४, दि. ०३ / ०४ / २०२४.

**वाचा :-** १. शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२.०६.२०१४.
२. शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.५१(२)/११, दिनांक १७.११.२०१४.

## परिपत्रक

**विषय :-** मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणे सादर करणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक शासकिय अधिकारी / कर्मचा-याने (गट-ड मधील कर्मचारी वगळता) कोणत्याही सेवेतील / पदावरील त्याच्या प्रथम नियुक्तीच्या वेळी व त्यानंतर शासन विहीत करेल त्या त्या वेळी विहीत नमुन्यामध्ये त्याचे मत्ता व दायित्व याबाबतचे विवरण सादर करणे बंधनकारक आहे.

प्रस्तुत प्रकरणी विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी व्यक्तीशः लक्ष घालून सदर शासन निर्णयात निर्देशित केलेप्रमाणे सन २०२३-२४ अखेरची मत्ता व दायित्वे या बाबतची माहिती प्रपत्र एक, दोन व तीन मध्ये संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे कडून सिलबंद लिफाप्यात घेण्यात यावेत. सदर विवरणे प्राप्त झालेनंतर विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचे दप्तरी सुरक्षीत ठेवण्यात येऊन सोबत जोडलेल्या विवरणपत्र-४ मध्ये माहिती एकत्रित संकलीत करुन ती या कार्यालयास दिनांक ३१.०५.२०२४ पर्यंत पाठविण्यात यावी.

तसेच येथुन पुढे प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन असे विवरण पत्र त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत विद्यापीठास सादर करण्याची व उक्त माहिती विहीत वेळेत उपलब्ध करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुख यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**सोबत :-** विवरणपत्र-४

प्र.कुलसचिव
मफुकृवि,राहुरी.

**प्रत :-** विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख / योजना प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी यांना माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

कृ.मा.प.

## विवरणपत्र -४

| अधिकारी / कर्मचा-याची गटवारी | दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंतच्या मालमत्तेचे विवरणपत्र सादर केलेल्या अधिकारी /कर्मचा-यांची संख्या | स्तंभ २ मधील विवरणपत्र सादर न केलेल्या अधिकारी / कर्मचा-याची संख्या | असे विवरणपत्र सादर न केलेल्या अधिकारी / कर्मचारी यापैकी किती अधिकारी / कर्मचा-यांवर कारवाई करण्यात आली. | अशी कारवाई केली नसल्यास त्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **कार्यालयाचे नाव :-** | | | | |
| अ | | | | |
| ब | | | | |
| क | | | | |

**कार्यालय प्रमुख सही / शिक्का**